मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ११६ ■ बुधवार, ३० जुलै २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# सतेज पाटील 'नेते' बनविणारी 'फॅक्टरी'?

## पाटलांच्यात प्रबळ आत्मविश्वास : पण काँग्रेसपुढे कोल्हापुरात संकटांचा डोंगर

**कोल्हापूर : विशेष प्रतिनिधी**

**सतेज पाटील नेते बनविण्याचा कारखाना आहे, हे सतेज पाटलांचे वक्तव्य कोल्हापुरात ढेपाळलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांना उर्जा देऊन जाणारे आहे. राजकारण आत्मविश्वासावरच चालतो, सत्ता येते, सत्ता जाते, नेत्यांजवळ आत्मविश्वास असेल तर गतवैभव पुन्हा मिळिवता येते. नेत्यांजवळ आत्मविश्वास पाहिजे, आणि तो कार्यकर्त्यांना दिला, तरच कार्यकर्ते तगून राहतात. हाच दिलासा सतेज पाटलांनी काँग्रेस मेळाव्यात कार्यकर्त्यांना दिला.**



२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेसने विजय मिळिवला, पण काही महिन्यांच्या आतच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र महाविकास आघाडीचे पर्यायाने काँग्रेसचे पानिपत झाले. नऊ विधानसभा मतदारसंघात भाजप तर एका मतदारसंघात भाजपचे सहयोगी विजयी झाले, दारूण पराभव झाला. अन्‍ तोंडावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्यानंतर ज्यांनी काँग्रेसच्या जीवावर सत्ता भोगली, ते जहाज बुडताना उंदरे जशी पहिल्यांदा बाहेर येतात, त्याचप्रमाणे काँग्रेसमधून बाहेर पडले आणि त्यांनी अन्य पक्षांचा मार्ग धरला. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर महापालिका, कोल्हापूर जिल्हा परिषद, पंचायत समित्या निवडणुकांचे आव्हान सतेज पाटलांसमोर आहे. ज्यांच्याबरोबर आतापर्यंत राजकारण केले, ते मंत्री हसन मुश्रीफ आता प्रतिस्पर्धी म्हणून उभे राहणार आहेत, अशा स्थितीत निवडणुकीला सामोरे जाण्याचे आव्हान सतेज पाटलांसमोर आहे यातच त्यांचा कस लागणार असल्याचे राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे. जे गेले ते गेले, जे जाणार आहेत, ते जातील पण त्यातून पक्षात पक्ष एकनिष्ठ राहतील, या धोरणावरच सतेज पाटील यांनी पुढील राजकीय वाटचाल सुरू ठेवली आहे.

ज्यांनी काँग्रेसची विचारधारा आयुष्यभर जपली त्या पी.एन.पाटील यांचे पुत्र राहुल पाटील सध्या अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेवर आहेत. राहुल पाटील आपला निर्णय फिरवतील असे सतेज पाटलांना वाटले होते, पण भविष्यातील राजकारणाचा विचार करत राहुल पाटील यांनी काँग्रेस मेळाव्याकडे दुर्लक्ष केले. माजी आमदार मालोजीराजे यांनीदेखील बैठकीकडे पाठ फिरविली. पण अशा स्थितीतही सतेज पाटील यांनी कार्यकर्त्यांना जो आत्मविश्वास दिला, त्याचे कौतुक कोल्हापुरात राजकीय जाणकारांतून केले जात आहे. काँग्रेस, राष्ट्रवादीचे प्राबल्य असताना जे काँग्रेसबरोबर होते, ते अनेकजण आता काँग्रेसला रामराम करत निघून गेले आहेत. ज्यांना सतेज पाटलांनी घडविले त्यापैकी कुणी कमळ हातात घेतले तर कुणी घडाळ्याच्या मागे लागले, तर कुणी धनुष्यबाण हातात घेऊन काँग्रेसचीच शिकार करण्याच्या तयारीला लागले आहेत.

पण सतेज पाटलांचा आत्मविश्वास प्रबळ आहे. 'हे दिवस देखील जातील' असा विश्वास त्यांच्यात असल्याचे काँग्रेस मेळाव्यात जाणवले. अनेकजण पदासाठी दुसऱ्या पक्षात जात आहेत. मला त्याचं वाईट वाटत नाही. माणसं येतात आणि जातात, पण माणसं तयार करणारी फॅक्टरी हा बंटी पाटील आहे. त्यामुळे मला काही फरक पडणार नाही. ज्यांना मोठं केलं ते जातात हा अनुभव मला अनेकदा आला आहे. तुम्ही एकनिष्ठ म्हणून काँग्रेसच्या मेळाव्याला आला आहात. ज्यांना निर्णय घ्यायचा होता त्यांनी घेतलेला आहे. ज्यांना निर्णय घ्यायचा त्यांनी घ्यावा. पण निवडणूक लागल्यानंतर मला शेवटच्या दिवसात कुणी फसवायचा प्रयत्न केला तर तो माझ्या टार्गेटवर असेल हे लक्षात ठेवा. शेवटच्या दहा दिवसांत माझ्यासोबत खांद्याला खांदा लावून काम करायचं आणि त्यानंतर कुणी वेगळा निर्णय घेतला तर मग त्याच्या प्रभागात माझा मुक्काम असणार. त्याचा करेक्ट कार्यक्रम करणार, अशा शब्दांत काँग्रेस मेळाव्यातील सतेज पाटलांचे वक्तव्य कार्यकर्त्यांना आधार देवून गेले त्यामुळे भविष्यकाळ घडविण्याची ताकद या माणसात आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे.

तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!
खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.
हॅलो प्रभात
सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव
सहज,जलद आणि स्मार्ट!

# शिराळ्यात 'नागपंचमी' भक्तीमय वातावरणात संपन्न

**शिराळा : हॅलो प्रभात**



हजारो वर्षांची परंपरा असलेली शिराळ्याची जगप्रसिद्ध नागपंचमी लाखो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाली.

शैक्षणिक उद्देशासाठी व स्थानिक लोकांमध्ये व समाजामध्ये सर्प संवर्धन पारंपरिक ज्ञान प्रसारासाठी २१ ग्रामस्थांना जिवंत नाग पकडण्यासाठी केंद्र सरकारने परवानगी दिल्यामुळे सर्वत्र समाधानाचे वातावरण होते. सकाळी १० वाजणेच्या सुमारास नाग पंचमीचे महात्म असणाऱ्या पांडुरंग उर्फ प्रमोद महाजनांच्या घरात मानाच्या पालखीचे पूजन करण्यात आले. त्याचे पौरोहित्य विनोद जोशी, यांनी केले.रामचंद्र महाजन यांच्या घरी पालखीचे संतोष जोशी व सुयोग जोशी यांनी पौरोहित्य केले.यावेळी कोतवाल, डवरी,भोई आदी मानकरी, उपस्थित होते,यावेळी मानाच्या नागराज याचा मुखवटा आणि मानाचा सराफ यांनी दिलेल्या नाग प्रतिमेचे पूजन करण्यात आले .त्यानंतर नाग प्रतिमेच्या मिरवणूकीला प्रारंभ झाला. पुर्वी जिवंत नागाची मिरवणूक काढली जायची,परंतु न्यायालयीन निर्बंध असलेमुळे प्रतिकात्मक नागाची मिरवणूक निघत आहे, ही मिरवणूक नायकूडपूरा येथून गुरूवार पेठ,कुरणे गल्ली,सोमवार पेठ आंबामाता रोड मार्गे काढण्यात आली. नाग मंडळाचे कार्यकर्ते, व तरुणाई विविध वाद्यांच्या तालावर मिरवणुकीसमोर नाचत होते, यावेळी अंबाबाईच्या नावाने चांगलं भलं च्या घोषणा देत होत होते. मिरवणूक मार्गावर बाळासाहेब ठाकरे शिवसेना, उद्धव ठाकरे शिवसेना, महाडिक युवाशक्ती, शिराळा युवक संघटना, सत्यजित देशमुख, यशवंत यांनी नागराज मंडळाचे स्वागत केले. प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन,तहसिलदार शामल खोत पाटील, जिल्हा पोलिस प्रमुख सचिन घुगे, पोलीस उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन थोरबोले पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त होता.

# प्रा.जकिया अलासे यांना पी.एच.डी. प्रदान

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**



येथील डी.के.टी.ई.च्या टेक्स्टाईल ऍन्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूट मध्ये टेक्स्टाईल विभागात कार्यरत असणारे प्रा.जे.ए.अलासे यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडून पी.एच.डी. इन इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग ही पदवी प्राप्त झाली आहे. प्रा.जाकिया अलासे हया गेली १९ वर्षापासून प्राध्यापक म्हणून डीकेटीईमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी 'ए नोवेल ऍपरोच टुवर्डस ऑब्जेक्टीव्ह इव्हॅलिशुएन ऑफ फॅब्रिक रिंकल्स युसिंग अर्टिफिसिएशल इन्टेलिजन्स' या विषयावर पी.एच.डी. प्रबंध पूर्ण केला आहे. या संशोधनासाठी डीकेटीईचे इटीसी विभागप्रुख प्रा. डॉ एस.ए.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. पी.एच.डी.पूर्ण झालेबद्दल संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी आमदार प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सौ. सपना आवाडे, व सर्व संचालक यांनी अभिनंदन केले व भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थेच्या संचालिका प्रा.डॉ.सौ.एल.एस. आडमुठे, डे.डायरेक्टर डॉ.यु. जे.पाटील, विभागप्रमुख प्रा.डॉ. एस.ए.पाटील उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### जिल्ह्यात अकरावीच्या ४२ हजार जागा रिक्तच

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेंतर्गत चौथ्या फेरीला सुरुवात झाली. तिसऱ्या फेरीअखेर अद्याप जिल्ह्यात ४२ हजार ८६ जागा रिक्त राहिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी अकरावीच्या प्रवेशाकडे पाठ फिरविल्याचे चित्र आहे.

राज्य मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेला कोल्हापूर जिल्ह्यातून ५३ हजार विद्यार्थी बसले, त्यामधील ५२ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दहावीच्या परीक्षेच्या निकाल वेळेत लागल्यानंतरही अकरावीची प्रवेश प्रक्रिया वेळेत सुरू झाली नाही. सुरुवातीपासूनच अकरावीची प्रवेश प्रक्रिया गोंधळात अडकलेली पाहायला मिळत आहे.

### केएमटीला ५० ई-बस मंजूर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

केंद्र सरकारने महापालिकेला आणखी ५० इलेक्ट्रिक बसेसची मंजुरी दिली आहे. यापूर्वी १९ ऑक्टोबर २०२३ ला १०० बसेस मंजूर झाल्या.

त्यामुळे एकूण १५० इलेक्ट्रिक बसेस केएमटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. परिणामी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक मजबूत होणार असून केएमटीच्या आर्थिक स्थितीमध्येही सकारात्मक बदल अपेक्षित आहे. यामुळे केएमटीची गाडी पुन्हा रुळावर येण्याची शक्यता आहे.

# डी.वाय.पाटील च्या विद्यार्थ्यांची ईथॉस फेलोशिपमध्ये उल्लेखनीय कामगिरी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



डी.वाय.पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कोल्हापूरच्या स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांनी ईथॉस फाउंडेशनच्या श्रम उपक्रमातर्गत राबवण्यात आलेली ङ्गडिग्निटी आणि इन्क्लुजन फेलोशिपङ्ग यशस्वीरित्या पूर्ण करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एकूण ६५ हजार रुपये अनुदानाच्या या फेलोशिपमध्ये विद्यार्थ्यांना बांधकाम प्रक्रियेतील मानवी योगदान समजून घेण्याची संधी मिळाली.इन्क्लुजन फेलोशिपअंतर्गत प्रा. गौरी म्हेतर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक म्हेत्रे, देवयानी देसाई, श्रद्धा जंगम, श्राव्या रेवनकर, तन्वी पाटील, गार्गी पवार, वैष्णवी गोसावी, पृथ्वीराज राजूरकर, आर्यन काळे ९ विद्यार्थ्यांच्या समूहाने टाईल लावणे, ब्रिकवर्क, प्लास्टरिंग आदी पारंपरिक कौशल्यांमध्ये निपुण ५० बांधकाम मजुरांच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतींमधून त्यांच्या पारंपारिक कौशल्यांचा गौरव करत, मजुरांना भेडसावणाऱ्या समस्या, अनुभव व परंपरा यांचे दस्तऐवजीकरण करण्यात आले. त्यांचे कौशल्य जपणे व संवर्धन करणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते.

प्रा.गीता वागळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिशा बुबनाळे, आर्यन पाटील, श्रीधन वडिंगे, मनीष भाटी, मृगजा पाटील, पियुष पाटील, पायल कोळी, श्वेताली देशमुख, प्रांजल मेघानी यानी डिग्निटी फेलोशिपअंतर्गत ६० हून अधिक साइट क्लिप्सचा वापर करून बांधकाम प्रक्रियेतील प्रारंभ ते शेवटच्या टप्प्यापर्यंतचे दोन सविस्तर व्हिडिओ डॉक्युमेंटेशन तयार केले. यामुळे विद्यार्थ्यांना बांधकाम प्रक्रियेचे सखोल ज्ञान मिळाले आणि कामाविषयीची संवेदनशीलता वृद्धिंगत झाली.

पाच महिन्यांची सखोल फेलोशिप पूर्ण केल्याबद्दल कार्यकारी संचालक डॉ. गुप्ता यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांचे आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले. पुढे डॉ. गुप्ता म्हणाले, अशा प्रकारच्या फेलोशिपमुळे विद्यार्थ्यांना बांधकामाच्या प्रत्यक्ष परिस्थितीची जाणीव होते. त्याचबरोबर श्रमिकांच्या अडचणी समजून घेण्याची संधी मिळते. या अनुभवाच्या आधारे कोल्हापूरमधील तांत्रिक संस्थांच्या समन्वयातून कोणते उपक्रम राबवता येतील, यावर एकत्र येऊन उपाययोजना आखण्याची गरज आहे. या यशस्वी उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, प्राचार्य डॉ.संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ.लितेश मालदे व आर्किटेक्चर विभागप्रमुख आर्किटेक्ट आय.एस.जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

K.E. Society's
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar
(Diploma)
Sakharale, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli, Pin-415414
Accredited by NAAC 'A+', AICTE, New Delhi.
Website : www.ritindia.edu, Email: director@ritindia.edu
ADMISSION NOTICE 2025-2026
FEW SEATS ARE VACANT AGAINST CAP WORKING PROFESSIONAL COURES
Applications are invited for Vacant Seats Against CAP for following Direct Second Year Diploma Working Professional Courses.

| No. | Course Name | Vacant Seats |
|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 13 |
| 2 | Mechanical Engineering | 30 |
| 3 | Electrical Engineering | 30 |

Eligibility : For Direct Second Year: Passed Higher Secondary School Certificate (HSC Science /ITI) or its equivalent, with at least 35% aggregate marks.
Important Note: All types of candidates aspiring for admission under Against CAP seats, it is mandatory to get documents verified & confirmed at Scrutiny Center.
Director
Contact: 8275822721, 7020262665, 02342-220329




# काँग्रेसच्या सुरेश वरपुडकर यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**



परभणी जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यमंत्री सुरेश वरपुडकर यांनी मंगळवारी आपल्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी श्री. वरपुडकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत केले. प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, परभणीच्या पालकमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर, आ. तानाजी मुटकुळे, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, मराठवाडा विभागीय संघटन मंत्री संजय कोडगे, अमर राजुरकर, भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, परभणी महानगर अध्यक्ष शिवाजी भरोसे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की, सुरेश वरपुडकर हे सामाजिक बांधिलकी ठेवून काम करणारे व्यक्तिमत्व आहे. दांडगा अनुभव पाठीशी असलेल्या वरपुडकर यांच्या पक्षप्रवेशाने परभणी जिल्ह्यात भाजपा संघटना अधिक मजबूत होईल. पक्षात प्रवेश केलेल्या सर्वांचा सन्मान राखला जाईल अशी ग्वाही श्री. चव्हाण यांनी दिली.

DKTE
डी.के.टी.ई. सोसायटीचे
टेक्स्टाईल अँड इंजिनिअरींग इन्स्टिट्यूट
राजवाडा, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.
(An Empowered Autonomous Institute)
Ph.No. (0230) 2421300, 2437316, 2439558, FAX NO.: (0230) 2432329
Website : www.dkte.ac.in E-mail : dktestextile@gmail.comToll Free No.1800 8431 300
INSTITUTE LEVEL ADMISSION 2025-26
Applications are invited from eligible candidates for Direct second year
WORKING PROFESSIONAL INSTITUTE LEVEL SEATS

| Sr.No. | Name of the Course | Vacant Seats |
|---|---|---|
| 1 | B.Tech. Mechanical Engineering (Working Professional) | 06 |

Eligibility Criteria: Educational qualification are as per rules laid down by Govt. of Maharashtra, Directorate of Technical Education, Maharashtra State Mumbai. Detailed Admission schedule Is displayed at the Institute's Notice Board & website. Interested candidates shall contact to the student section and submit the admission application form. in case a candidate is unable to submit the application directly to the concerned institution for any reason, the candidate shall have the opportunity to apply through the website of the Competent Authority till the date of allotment of final CAP Round.
DIRECTOR




# ‘दिव्या’ची कामगिरी स्वप्नवत अशीच

जागतिक महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत मराठमोळ्या दिव्या देशमुखने भारताच्याच कोनेरू हंपी हिला टायब्रेकरमध्ये २.५ – १.५ अशी आघाडी घेऊन विश्वविजेतेपद मिळवले आणि इतिहास घडवला. अवघ्या १९ वर्षाच्या दिव्याची ही कामगिरी स्वप्नवत अशीच आहे. तिच्या या कामगिरीने १३ कोटी मराठी माणसांचीच नाही तर १४५ कोटी भारतीयांची मान देखील अभिमानाने उंचावली आहे. हे विश्वविजेतेपद मिळवून दिव्याने आपणच ६४ घरांची नवी राणी असल्याचे सिद्ध केले. तिच्या कामगिरीचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे कारण ही स्पर्धा जेंव्हा सुरू झाली तेंव्हा तिला कोणीही जमेस धरले नव्हते. तिच्यापेक्षाही दिग्गज आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत जगभरातील १०७ बुद्धिबळपटू निवडले गेले होते. बाद फेरीने रंगलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीसाठी निवडलेल्या बुद्धिबळपटूत अव्वल तीन खेळाडू हे चीनचे होते. चौथी खेळाडू ही भारताचीच अंतिम फेरीत पोहचलेली कोनेरू हंपी होती. दिव्याचे स्थान पंधरावे होते. अंतिम फेरीसाठी आठ भारतीय आणि आठ चिनी खेळाडूंची निवड झाली होती. रशियाचेही काही खेळाडू अंतिम फेरीत होते. चीन, रशिया या देशातील खेळाडूंचा या स्पर्धेत दबदबा होता. भारताच्याही कोनेरू हंपी हिला विश्वविजेतेपदासाठी प्रबळ दावेदार समजले जात होते पण नवख्या दिव्याला मात्र कोणीच या स्पर्धेचे संभाव्य विजेते म्हणून संबोधले नव्हते मात्र जशीजशी स्पर्धा पुढे सरकत गेली तशीतशी दिव्याची कामगिरी सरस ठरत गेली. आपल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंवर मात करत दिव्या पुढे जात होती. अंतिम फेरी चीनच्या दोन खेळाडूत होईल अशी स्पर्धेच्या सुरवातीस जी शक्यता वर्तवण्यात आली होती ती फोल ठरवत दिव्या आणि कोनेरू यांनी सर्वांना चकित करून अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत दोन भारतीय खेळाडू असल्याने हा विश्वचषक भारताकडेच राहील हे स्पष्ट झाले. अंतिम फेरीत दिव्याची गाठ अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हंपी हिच्याशी पडली. ३८ वर्षीय ग्रँडमास्टर कोनेरू हंपी ही भारताचीच नव्हे तर जगातील दिग्गज बुद्धिबळपटू आहे. तिने याआधी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अंतिम फेरीपूर्वी कोनेरूच सर्वाची हॉट फेवरेट होती कारण १९ वर्षाची दिव्या तिच्यापुढे अतिशय नवखी होती. कोनेरूने २००२ साली जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर तीन वर्षांनी दिव्याचा जन्म झाला होता. कोनेरूकडे अनुभव होता तर दिव्याकडे आत्मविश्वास होता. उपांत्य फेरीत दोघींनी चीनच्या खेळाडूंवर मात केली होती. अंतिम फेरीच्या सुरुवातीचे दोन्ही डाव बरोबरीत सुटले. टायब्रेकरच्या दुसऱ्या डावात दिव्याने वर्चस्व राखले. तिने हा डाव ७५ चालित जिंकला आणि विश्वविजेतेपदावर मोहोर उमटवली. अंतिम फ रीत अनुभवावर आत्मविश्वासाने मात केली आणि दिव्या बुद्धिबळाची नवी राणी ठरली. हा विश्वकप जिंकणारी दिव्या ही भारताची चौथी खेळाडू ठरली. याआधी हा किताब कोनेरू हंपी , रमेशबाबू वैशाली आणि द्रोणवली हरिका यांनी जिंकला होता. या विजेतेपदाबरोबर दिव्या आता ग्रँडमास्टरही बनली आहे. ग्रँडमास्टर ठरणारी ती भारताची चौथी खेळाडू ठरली आहे. अर्थात दिव्याला मिळालेले हे यश एका रात्रीत मिळालेली नाही त्यासाठी तिला मोठा त्याग आणि परिश्रम करावे लागले आहे. ज्या वयात मुले टीव्हीवर कार्टून पाहण्यात व्यग्र असतात त्या वयात तिने बुद्धिबळ खेळण्यास सुरुवात केली. बुद्धिबळासाठी ती टीव्ही आणि मोबाईलपासून दूर राहिली. दिव्याने बुद्धिबळावर लक्ष केंद्रित करावे म्हणून तिच्या पालकांनी घरातील टीव्ही बंद केला. बुद्धिबळात आवड निर्माण झाल्यावर दिव्याने अवघ्या पाचव्या वर्षी पहिले विजेतेपद मिळवले. पाचव्या वर्षी बुद्धिबळात पहिले विजेतेपद मिळवणाऱ्या दिव्याने पुढे आपल्या विजेतेपदाचा धडाका सुरू केला. दिव्याने २००२ साली महिला बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आणि त्यानंतर पुढील वर्षी आशियाई स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. दिव्या अंडर २० विश्वचषक स्पर्धेची ज्युनियर चॅम्पियन देखील ठरली आहे. तिचा हा प्रवास निश्चितच प्रेरणादाई आहे. तिचे हे विजेतेपद देशातील किशोरवयीन मुलांसाठी प्रेरणादाई आहे. तिच्यामुळे आता ही मुले देखील बुद्धिबळाकडे वळतील आणि भविष्यात भारताला आणखी दिव्या मिळतील यात शंका नाही. नवी राणी बनलेल्या मराठमोळ्या दिव्या हिचे मनापासून अभिनंदन!

# मराठी संगीत रंगभूमीवरील अभिनेते; हिंदुस्तानी संगीत शैलीतील प्रसिद्ध गायक : डॉ. वसंतराव देशपांडे

हॅलो प्रभात


हिंदुस्तानी संगीतशैलीतील प्रसिद्ध गायक, मराठी संगीत रंगभूमीवरील अभिनेते वसंतराव देशपांडे देशपांडे यांचा जन्म २ मे १९२० रोजी अकोला जिल्ह्यातील, मूर्तिजापूर, ता. सावळापूरमध्ये एका देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. वसंतराव देशपांडे हिंदुस्तानी शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीत क्षेत्रातील आघाडीचे गायक होते. त्यांना संगीत नाटक अकादमीने पुरस्कार देऊन गौरविले होते. मराठी गायक राहुल देशपांडे हे वसंतरावांचे नातू आहेत.

विदर्भातील एका देशस्थ ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या वसंतरावांचे वडील श्रीमंत आणि जमीनदार होते. मात्र, वसंतराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वसंतरावांना घेऊन त्यांची आई सासरच्या घरातून बाहेर पडली. त्यांची काहीही चूक नसताना त्यांचा त्या घरातील हक्क नाकारण्यात आला.

वसंतराव लहान असतानाच सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते व दिग्दर्शक भालजी पेंढारकरांनी त्यांच्यातील कलागुण हेरले. त्यांना १९३५ साली प्रदर्शित झालेल्या ‘कालियामर्दन’ या हिंदी चित्रपटात कृष्णाची भूमिका दिली. त्यानंतर वसंतराव कलाकार म्हणून उदयास आले.













देशपांडे यांनी शंकरराव सप्रे, असदअली खाँ, सुरेशबाबू माने, अमानतअली खाँ, अंजनीबाई मालपेकर, रामकृष्णबुवा वझे अशा विविध गुरूंकडून संगीताचे शिक्षण घेतले. त्यांनी संगीत विषयात पीएचडी केली होती. प्रारंभीची चोवीस वर्षे त्यांनी संरक्षण विभागात हिशेब खात्यात नोकरी करीत संगीताची उपासना चालू ठेवली. या काळात त्यांनी संगीताच्या कार्यक्रमासाठी अफ्रिकेचा दौरा केला. तसेच पेडगावचे शहाणे, गुळाचा गणपती, दूधभात, अवघाची संसार वगैरे चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. त्यानंतर मात्र नौकरी सोडून त्यांनी पूर्णवेळ संगीताला वाहून घेतले. त्या काळात कट्यार काळजात घुसली या नाटकामुळे त्यांची लोकप्रियता अतिशय वाढली. सर्व प्रकारच्या गायकीवर आणि तबला, संवादिनी या वाद्यांवर त्यांचे प्रभुत्व होते. इ.स. १९८२ सालच्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण नागपूरला शंकरराव सप्रे यांच्याकडे झाले. सप्रे ख्यातनाम शास्त्रीय गायक विष्णू दिगंबर पलुसकरांचे शिष्य होते. नंतरच्या काळात भेंडी बाजार घराण्याचे गायक अमान अली खान आणि अंजनीबाई मालपेकर, किराणा घराण्याचे गायक सुरेशबाबू माने, पतियाळा घराण्याचे असद अली खान आणि ग्वाल्हेर घराण्याचे रामकृष्णबुवा वझे अशा मातब्बर गायकांकडे त्यांना शिकायला मिळाले. मात्र, दीनानाथ मंगेशकरांच्या गायकीचा वसंतरावांच्या गाण्यावर मोठा प्रभाव होता. नामवंत दीनानाथ मराठी नाट्य कलाकार, नाट्य संगीत दिग्दर्शक आणि हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील मोठे नाव होते.

वसंतरावांना मंगेशकर यांच्या गायकीचे खरे आणि एकमेव वारसदार मानले जात असले, तरी वसंतरावांचा नक्कल करण्यास विरोध होता. शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीतात त्यांनी दाखवलेली प्रतिभा अजोड होती. गायनाबरोबरच ते उत्तम तबलावादक व पेटीवादकही होते. सरगम ही त्यांची एक विशेष खासियत होती. त्यांनी राज कल्याण हा राग तयार केला. हा एक यमन रागाचा (एक संपूर्ण राग) प्रकार असून, यामध्ये पंचम वर्ज्य आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील ठुमरी, दादरा, गझल या प्रकारांवरही त्यांची हुकमत होती. लाहोरमध्ये शिक्षण घेत असताना ते ऊर्दू भाषा शिकले, त्याचा त्यांना गझल गायनासाठी उपयोग झाला.

देशपांडेंनी आपल्या गायनातील कौशल्य मराठी नाट्यसंगीत क्षेत्रातही दाखवून दिले होते. ‘मेघ मल्हार’, ‘कट्यार काळजात घुसली’, ‘वीज म्हणाली धरतीला’, ‘हे बंध रेशमाचे’, ‘तुकाराम आणि वाऱ्यावरची वरात’ ही त्यांच्या अभिनय कारकिर्दीतील ठळक नावे. ‘कट्यार काळजात घुसली’ या नाटकातील खान आफताब हुसेन खानसाहेब या भूमिकेने तर त्यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली. या नाटकाला लाभलेल्या उत्तुंग लोकप्रियतेमुळे ते पंडित वसंतराव देशपांडे या नावाने ओळखले जाऊ लागले.

देशपांडे यांनी ‘हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील क्रांती’ (The Revolution of Hindustani Classical Music) या विषयात पीएचडी केली. या विषयावर अनेक शिक्षण संस्थांमधून त्यांनी प्रात्यक्षिक सादरीकणासह व्याख्यानेही दिली. ‘मराठी नाट्यसंगीतांची वाटचाल’ हा मराठी संगीत नाटकांचा इतिहास उलगडून दाखविणारा त्यांचा कार्यक्रमही खूप गाजला. हा कार्यक्रम प्रथम दिल्लीत, रोज सहा तास याप्रमाणे सलग तीन दिवस सादर करण्यात आला होता. त्यांचा शिष्यवर्गही मोठा होता. चंद्रकांत लिमये आणि विजय कोपरकर हे त्यांचे नामवंत शिष्य.

वसंतरावांना १९८२ साली कार्यरत कलाकारांसाठीचा सर्वोच्च असा संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यानंतर ३० जुलै १९८३ रोजी वयाच्या ६३ व्या वर्षी त्यांचे पुण्यात निधन झाले.

डॉ. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठानतर्फे त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी ‘वसंतोत्सव’ हा तीन दिवसीय संगीत महोत्सव आयोजित केला जातो. या महोत्सवादरम्यान, होनहार कलाकारांसाठी वसंतोत्सव युवा पुरस्कार आणि दिग्गज कलाकारांसाठी वसंतोत्सव पुरस्कार असे दोन पुरस्कार दिले जातात.

भारत सरकारच्या दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्रातर्फे (South Central Zone Cultural Centre/SCZCC) त्यांच्या स्मरणार्थ २०११ साली आणखी एका तीन दिवसांच्या संगीत आणि नृत्य महोत्सवाचे आयोजन नागपुरात केले गेले होते.

वसंतराव देशपांडे मेमोरिअल फाउंडेशन (चिंचवड) ही संस्था इ.स. १९८९ सालापासून, दरवर्षी मेच्या पहिल्या आठवड्यात संगीत महोत्सव साजरा करते. या संस्थेने आजवर अनेक गुणी कलाकारांना संधी दिली व त्यांना घडविले. दरवर्षी ही संस्था तरुण उभरत्या गायकांना वसंतराव देशपांडे युवा पुरस्कार दिला जातो. मे २०१३ मध्ये झालेल्या २५ व्या वर्षीच्या महोत्सवात नाट्यसंगीतासाठी लीलाधर चक्रदेव याला आणि शास्त्रीय संगीतासाठी आर्या आंबेकर हिला ‘डॉ. वसंतराव देशपांडे युवा पुरस्कार’ देण्यात आले होते. २५०० रुपये रोख, स्मृतिचिन्ह, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठानच्या वतीने जानेवारी महिन्यात त्याचे आयोजन केले जाते. या महोत्सवात होतकरू युवा गायकाला वसंतोत्सव युवा पुरस्कार आणि दिग्गज गायक कलाकाराला वसंतराव पुरस्कार दिला जातो. त्यांचे नातू राहुल देशपांडे हे या प्रतिष्ठानचे विश्वस्त आहेत. राहूल देशपांडे यांनी आजोबा वसंतराव देशपांडे यांच्या जीवनावर आधारित ‘मी वसंतराव’ नावाचा चित्रपट दिग्दर्शित केल्यानंतर १ एप्रिल २०२२ रोजी प्रदर्शित झाला होता.

## किया इंडियाने सर्टिफाईड प्री-ओन्ड नेटवर्क १०० आऊटलेट्सपर्यंत वाढवले

मुंबई : हॅलो प्रभात

किया इंडिया या देशातील आघाडीच्या मास-प्रीमियम ऑटोमोबाइल ब्रँडने आपल्या १००वे किया सर्टिफाईड प्री-ओन्ड (सीपीओ) आऊटलेटचे उद्घाटन करत मोठा टप्पा गाठला आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यासह किया फक्त तीन वर्षांमध्ये १०० आऊटलेट्सचे शक्तिशाली व पूर्व-मालकीच्या वेईकलचे नेटवर्क विकसित करणारी भारतातील सर्वात वेगवान ओईएम ठरली आहे. दीर्घकालीन मूल्य आणि ग्राहक-केंद्रित सोल्यूशन्स वितरित करण्याप्रती कटिबद्धतेशी बांधील राहत किया इंडिया आपल्या सीपीओ वेईकल्सवर जवळपास २ वर्षे/४०,०० किमीपर्यंत वॉरंटी कव्हरेज, तसेच सर्वसमावेशक व ग्राहक-केंद्रित सर्टिफाईड प्री-ओन्ड उपक्रम आहे.

## कायनेटिक डीएक्स इलेक्ट्रिक स्कूटर भारतात लॉन्च

मुंबई : हॅलो प्रभात



कायनेटिक इंजिनियरिंग लिमिटेड (केइएल) ने संपूर्ण नवीन कायनेटिक डीएक्स इव्हीच्या लॉन्चसह दुचाकी बाजारात आपल्या पुनरागमनाची घोषणा केली आहे. ही नवीन मेड-इन-इंडिया मॉडेल श्रेणी केडब्ल्यूव्ही या त्यांच्या कंपनीद्वारे तयार करण्यात आली आहे. महत्त्वाचे फीचर म्हणजे २.६ केडब्ल्यूएच महत्तम क्षमतेची एलएफपी बॅटरी, ही बॅटरी डीएक्स+ वर ११६ किमी ची आयडीसी रेंज देईल, असे अनुमान आहे. कारण यात महत्तम कार्यक्षमतेसाठी के-कोस्ट रिजनरेटिव्ह टेक्नॉलॉजी आणि एक ६0व्हीची सिस्टम आहे. यामध्ये एक दमदार मोटर देखील आहे, जी ३ मोड्स सह ताशी ९0 किमी वेगापर्यंतची गती देण्यास सक्षम आहे.

## फॅबइंडिया तर्फे नवीन ब्रँड ‘फॅबन्यू’ लाँच

पुणे : हॅलो प्रभात




फॅबइंडिया या भारतातील लोकप्रिय लाइफस्टाइल ब्रँडने आपल्या आश्रयांतर्गत नवीन ब्रँड ’फॅबन्यू’ लाँच केला आहे. हा ब्रँड किफायतशीर दरांमध्ये समकालीन श्रेणी देतो, ज्यामधून कालातीत आकर्षकता आणि विश्वसनीय दर्जाची खात्री मिळेल. ब्रँडच्या डिझाइन तत्त्व व आकर्षकतेप्रती कटिबद्धतेशी बांधील राहत फॅबन्यू पुरूष व महिलांसाठी पाश्चिमात्य पोशाख, भारतीय पोशाख व फूटवेअरमधील आधुनिक स्टाइल्स, तसेच महिलांसाठी आभूषणे सादर करतो. ज्यामुळे दैनंदिन वेअर, कामासाठी परिधान केले जाणारे पोशाख आणि उत्सवी पोशाखांच्या गरजांची पूर्तता होते. कलेक्शन आणि जवळच्या स्टोअर्सबाबत www.fabnu.in येथे माहिती मिळेल.

## पेटीएम ट्रॅव्हल मेगा फेस्टिव्हल सेल सुरु

मुंबई : हॅलो प्रभात




भारतातील अग्रगण्य मोबाईल पेमेंट आणि वित्तीय सेवा वितरण कंपनी आणि मोबाईल पेमेंट्स, क्यूआर कोड्स आणि साउंडबॉक्सचे प्रणेते पेटीएमने ’पेटीएम ट्रॅव्हल मेगा फेस्टिव्हल सेल’ जाहीर केला आहे. या सेलमध्ये रक्षाबंधन, स्वातंत्र्यदिन आणि जन्माष्टमीसारख्या सणांपूर्वी फ्लाइट आणि बस बुकिंगवर २०% पर्यंत सूट दिली जात आहे. पेटीएम ट्रॅव्हल मेगा फ स्टिव्हल सेल ३१ जुलै २०२५ पर्यंत सुरू आहे आणि याचा उद्देश सणासुदीच्या काळात कुटुंब भेटी, लांब विकेंड ट्रिप्स किंवा सुट्ट्यांच्या योजनांसाठी प्रवास अधिक परवडणारा बनवणे आहे. कंपनीने बँक ऑफ बडोदा, आयसीआयसीआय बँक आणि आरबीएल बँक यांसारख्या आघाडीच्या बँकांसोबत भागीदारी केली आहे.

## मोल्ड-टेक पॅकेजिंगची पहिल्या तिमाहीत उत्कृष्ट कामगिरी

मुंबई : हॅलो प्रभात

मोल्ड-टेक पॅकेजिंग लिमिटेडने ३० जून २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक परिणाम जाहीर केले असून कंपनीने उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे. कंपनीने सर्व प्रमुख व्यवसाय विभागांमध्ये चांगल्या गतीसह एकूण विक्रीच्या प्रमाणात १५% ची प्रभावी वाढ नोंदवली जी सुधारित उत्पादन मिश्रण आणि वाढीव क्षमता वापर दर्शवते. निकालांची घोषणा करताना अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक जे लक्ष्मण राव म्हणाले, ‘ही उत्कृष्ट कामगिरी मोल्ड-टेक्सच्या नावीन्यपूर्णता आणि धोरणात्मक विस्तारावर लक्ष केंद्रित केल्यामुळे आहे. फार्मा पॅकेजिंग महसूल वाढल्यामुळे २०२६ च्या प्रति किलो एबिटा ४१.६४ रुपये झाला.

## जगातील पहिले ऑटोमॅटिक टी मेकर ‘चाय मॅजिक’ लाँच

मुंबई : हॅलो प्रभात



भारतातील आघाडीचा किचन अप्लायन्स ब्रँड वंडरशेफने आज भारतीय शैलीतील चहासाठी डिझाइन केलेले जगातील पहिले ऑटोमॅटिक टी मेकर चाय मॅजिक लाँच केले. लॉन्चप्रसंगी वंडरशेफचे सह-संस्थापक शेफ संजीव कपूर आणि श्री. रवी सक्सेना उपस्थित होते. लॉन्चप्रसंगी चाय मॅजिकचा लाईव्ह डेमोदेखील दाखवण्यात आला, ज्यामध्ये मसाला चहापासून ते आल्याच्या चहापर्यंत आणि क्लासिक दुधाच्या चहापासून ते काश्मिरी कहवापर्यंत विविध प्रकारच्या चहा बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. चाय मॅजिक वापरण्यास अत्यंत सोपे आहे आणि पूर्ण नियंत्रणासह स्वादिष्ट चहा कसा तयार करतो हे डेमोमध्ये दाखवण्यात आले.

## भारतातील सर्वात मोठ्या हत्ती सेवा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

मुंबई : हॅलो प्रभात



अनंत अंबानी यांच्या नेतृत्वाखालील भारतातील अग्रगण्य वन्यजीव बचाव व संवर्धन केंद्र वनतारा आणि भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या प्रोजेक्ट एलिफंटच्या संयुक्त विद्यमाने ‘वनतारा गजराज सम्मेलन’ या पाच दिवसांच्या विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन जामनगर येथे करण्यात आले आहे. हत्तींच्या सेवा आणि संवर्धनाला समर्पित असलेला हा भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रशिक्षण कार्यक्रम आहे.

या शिबिरात १०० हून अधिक महावत व हत्ती विषयक तज्ज्ञ पारंपरिक तसेच आधुनिक वैज्ञानिक पद्धतींच्या सहाय्याने हत्तींच्या काळजी व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेणार आहेत. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सर्व सहभागींपर्यंत अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येईल.

वनताराचे सीईओ विवान करानी यांनी सांगितले, हे सम्मेलन केवळ प्रशिक्षणाचा उपक्रम नाही, तर करुणा आणि संवेदनशीलतेच्या भावी युगाची पायाभरणी आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. ‘ए’, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली– ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. ‘ए’, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# माळवाडी येथे वडीलांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण



**कोतोली : हॅलो प्रभात**

कोतोली पैकी माळवाडी (ता.पन्हाळा) येथील उपसरपंच सागर पाटील यांनी वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ माळवाडी गावाच्या हद्दीत वृक्षारोपण उपक्रम राबवला. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विविध वृक्षांची लागवड केली असून, या उपक्रमात स्थानिक नागरिक आणि तरुण मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या वृक्षारोपण उपक्रमात दत्तात्रय चौगुले, आबा सागर चौगुले, भाऊसौ सागावकर, विजय सागावकर, किरण खोत, सचिन रायकर, सिद्धेश पाटील यांच्यासह धूम आणि फ्रेंडशिप ग्रुप, साई पाटील, छोट्या कळेकर, आणि जय शिवराय क्रिकेट क्लब, माळवाडी या मंडळांनी मोलाचा सहभाग घेतला. सागर पाटील हे नेहमीच सामाजिक कार्यात पुढाकार घेतात. परिसरात स्वच्छता, पर्यावरण संवर्धन यांसारख्या उपक्रमांत त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे गावकरी वर्गात समाधान व्यक्त होत असून अनेकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

# पृथ्वी मोरे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गोखले कॉलेज शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन अधिकारी पृथ्वी अजित मोरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्सवमूर्ती वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात केक कापून झाली. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी मोरे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या यशस्वी कार्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. या प्रसंगी शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, अंजली देसाई, पेट्रन कौन्सिलचे सदस्य दौलत देसाई, चेअरमन प्रा. डॉ. मंजिरी मोरे, माजी नगरसेवक अजित मोरे, अजितराव मोहिते आदींसह देसाई, मोरे व मोहिते कुटुंबातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील तरुण मंडळांचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, विविध संस्था-मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनीही उपस्थित राहून पृथ्वी मोरे यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सौहार्दपूर्ण आणि स्नेहभावनेने पार पडले. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांसाठी स्आनेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

# हुपरी शहरांमध्ये घाणीचे साम्राज्य



**हुपरी : हॅलो प्रभात**

हुपरी शहरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरले शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे साथीची साथ व आजार पसरण्याच्या कारणीभूत स्वच्छतेचे तीन तेरा वाजले आहेत. गटारी वेळोवेळी काढल्या जात नाहीत, गटारीची काढलेली ताण लवकर घेऊन न जाणे, घंटागाडी नियमीत न येणे, आठवडी बाजार झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी भर बाजारातील कचरा तसाच पडून राहत आहे. त्याचे नियोजन नाही, हुपरी शहरासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे त्याच्याभोवती दुर्गंधी झाली. घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून येत आहे. तसेच गाव भागातील प्रसाधानगृह अशा बऱ्याच ठिकाणी कचऱ्याची समस्या देखील आहे, या सर्व बाबीकडे आरोग्य प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असून मुख्याधिकारी यांनी लक्ष द्यावे व ताबडतोब आरोग्य यंत्रणा सतर्क करावी अन्यथा शिवसेना युवा सेना यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी हुपरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय नरळे, आरोग्य अधिकारी श्री सागर येराणे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना तालुकाध्यक्ष अजितराव सुतार हुपरी शिवसेना शहरप्रमुख अजित ऊगळे, गोपी शेट्टे, सुभाष कागले, यांच्यासह युवा सेनेचे सैनिक व भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दत्त चरणी महाअभिषेक



**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे उद्धव ठाकरे यांच्या जन्मदिवसानिमित्त श्री दत्त चरणी निरोगी व उदंड आयुष्यासाठी महा अभिषेक करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना कोल्हापूर जिल्हा प्रमुख वैभव उगळे, तालुका प्रमुख संजय अनुसे, तालुका संघटक राजू पाटील, शिवसेना कोल्हापूर जिल्हा संघटिका मंगलताई चव्हाण, उपजिल्हा संघटिका वैशाली जुगळे, दयानंद मालवेकर, युवासेना उपजिल्हा प्रमुख प्रतीक धनवडे, युवासेना तालुका प्रमुख निलेश तवंदकर, उपजिल्हा समन्व्यक पिंटू पाटील, उपतालुकाप्रमुख संजय घोरपडे, युवराज घोरपडे, विकास सुतार, राहुल काकडे, शिक्षकसेना तालुका प्रमुख बाळिसंग रजपूत, उपतालुका संघटिका परविन जमादार, उपतालुका संघटिका रुपाली संकपाळ, उपतालुका संघटिका शशिकला वाडीकर, कुरुंदवाड शहर संघटिका राजश्री मालवेकर शिरोळ शहर संघटिका रेखा पाटील, जयसिंगपूर शहर संघटिका रेखा घाटगे, युवासेना उपतालुका तालुका समन्वयक मंगेश पाटील, असिफ विजापुरे, शिव आरोग्यसेना ऋषभ चौगुले व शिवसैनिक उपस्थित होते.

# भाजप किती दिवस नेहरू, इंदिरा गांधींचं नाव घेणार?

**सांगली : हॅलो प्रभात**

पहलगाम हल्ल्याला शंभर दिवस झाले, मात्र अद्याप हल्लोखोर आतंकवाद्यांचं काय झालं कळत नाही. विरोधकांनी प्रश्न विचारला की भाजप सरकार नेहरू आणि इंदिरा गांधी याचं नाव घेतं. काँग्रेसनं काय केलं, असं विचारलं जातं. किती दिवस हे करणार? तुमची उत्तर देण्याची जबाबदारी आहे, त्यावर बोला, अशी आक्रमक भूमिका खासदार विशाल पाटील यांनी संसदेत मांडली.

पहलगाममधील आतंकवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर संदर्भातील चर्चेत त्यांनी सहभाग घेतला. ते म्हणाले, ''सैन्याने ऑपरेशन सिंदूरमध्ये शौर्य गाजवले. त्यांना नमन आहे. पाकिस्तान चीनच्या मागे लपला होता.

ते म्हणत राहतील, आमचं काही नुकसान झालं नाही, त्यांना म्हणू द्या. आता उत्तर द्यायला हवं की युद्धविराम का केला? ट्रम्प म्हणतात, 'मी युद्धविराम केला.' सरकार म्हणतं, 'आम्ही युद्धविराम केला.' त्यानंतरही पाकिस्तान हल्ला करत राहतं. प्रश्न आहे की, 'युद्धविराम कुणी केला.' युक्रेन युद्ध आपण थांबवलं असेल तर मग आपल्या युद्धाबाबत



आपण निर्णय का घेऊ शकलो नाही.' ते म्हणाले, 'आपल्या देशात येऊन सामान्य भारतीयांना दहशतवाद्यांनी मारलं. आपल्या गुप्तचर यंत्रणेचे हे अपयश नाही का? त्याबाबत कारवाई का झाली नाही. १०० दिवसानंतरही आतंकवादी मिळत नाहीत,

हे सरकारचे अपयश नाही का? आपण कुणाचा राजीनामा मागितला नाही, सारे सरकारच्या पाठीशी उभे राहिले. विदेशात जायला सर्व पक्षातील लोक पुढे आले. देशाचा आवाज बुलंद केला. आता उत्तर देण्याची सरकारची वेळ आहे. 'काय झालं, काय चुकलं?' हे विचारणं देशद्रोह आहे का? आमच्या बहिणींचा कुंकू पुसणाऱ्यांना पकडून भारतात आणा आहे, असं म्हणणं चुकीचं आहे का?'

**सुरक्षा क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात ९.५ टक्के वाढ केली आहे. हा निधी पगार आणि निवृत्ती वेतनात खर्च होतोय. पार्लमेंटरी स्टँडिंग कमिटी म्हणते की अर्थसंकल्पाच्या तीन टक्के खर्च सुरक्षा व्यवस्थेसाठी गरजेचा आहे. तो दोन टक्के होतोय. त्यात पन्नास टक्के वाढीची गरज आहे.**

• खा.विशाल पाटील

# हिंदी देशाचा सांस्कृतिक वसा जोपासणारी भाषा : डॉ.पडोळकर

**जत : हॅलो प्रभात**

स्वातंत्र्य लढ्यात हिंदी भाषेने वैचारिक संवादासाठी मोठी भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्य लढा विचारांनी लढला गेला. हिंदी भाषा ही राष्ट्रीय चळवळीची भाषा राहिली आहे. अनेक हिंदी लेखकांनी त्यांच्या साहित्यातून राष्ट्रीय चळवळीतील क्रांतिकारकांना प्रेरणा दिली आहे. त्यामुळे हिंदी ही राष्ट्रप्रेम, भारतीय परंपरा, व सांस्कृतिक वसा जोपासणारी भाषा म्हणून सुद्धा ओळखली जाते असे प्रतिपादन डॉ. सतीशकुमार पडोळकर यांनी केले. ते सांगली जिल्हा हिंदी शिक्षक संघ (नोंदणीकृत)



आणि माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जत-कवठे महांकाळ तालुक्यातील हिंदी शिक्षकांच्या सहविचार सभेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

या सहविचार सभेचे प्रमुख पाहुणे म्हणून जत पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अन्सार शेख हे उपस्थित होते. हिंदी शिक्षकांशी संवाद साधताना ते म्हणाले, शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये कथा, कविता इत्यादी साहित्यिक शैलींचे सर्जनशील लेखन करण्याची कला विकसित करावी. या सहविचार सभेच्या अध्यक्षस्थानी सांगली जिल्हा हिंदी अध्यापक मंडळाचे अध्यक्ष शि.रा.अडसूळ होते.

सहविचार सभेची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. कवी किशोर दीपंकर यांनी स्वागत गीत आणि हिंदी गौरव गीत सादर केले. सांगली जिल्हा हिंदी शिक्षक संघाचे उपाध्यक्ष, समर्थ शिवप्रभू हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, येळवीचे प्राचार्य नंदकुमार खंडागले जी यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले आणि कौतुकास्पद शब्दांनी ओळख करून दिली. संजय सर्जे यांनी सूत्रसंचालन तर आभार रावळगुंडवाडी येथील हिंदी शिक्षक बसाप्पा हिरगोंड यांनी मानले.

# सापांविषयी समज व गैरसमज विषयावर पोस्टर प्रदर्शन



**तासगाव : हॅलो प्रभात**

वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने नागपंचमीचे औचित्य साधून सापांविषयी 'समज व गैरसमज'या विषयावर पोस्टर प्रदर्शन तयार केले. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे म्हणाले पृथ्वीवर आढळणाऱ्या सापापैकी फक्त तीन टक्के साप विषारी जातीत गणले जातात.इतर सर्व सापांच्या जाती बिनविषारी गटात मोडतात. सापाला शेतकऱ्याचा मित्र असे म्हणतात. कारण शेतातील उंदरांची संख्या कमी करण्यासाठी त्यांची मदत होते.सापांविषयी गैरसमज पसरवू नयेत ,साप डूक धरत नाहीत. दूध पित नाहीत,त्यांना ऐकू येत नाही.पावसाळ्यात त्यांची बीळे पाण्याने भरल्यामुळे साप बाहेर दिसतात.कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ.पी.बी.तेली यांनी केले तर आभार प्रा.शैलजा कुसरकर यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पुनम पाटील यांनी केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रोफेसर डॉ.एन.ए.कुलकर्णी, प्रा.प्रभाकर पाटील, डॉ. अर्जुन वाघ, डॉ.सुनील गावित, डॉ.अमोल पाटील, प्रा.प्रगती जाधव, नलिनी कदम व इतर विभागातील गुरुदेव कार्यकर्ते व विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पृथ्वीराज पाटील काँग्रेसमध्ये राहणार की भाजपात जाणार?

**सांगली : हॅलो प्रभात**

काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांच्याबाबत आज मुंबईत नाट्यमय घडामोडी घडल्या. ते भाजपमध्ये बुधवारी प्रवेश करणार असे सांगितले जात होते. त्यादृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी त्यांची चर्चा झाली. काही गोष्टींची स्पष्टता झाल्यानंतरच याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका पाटील यांनी या बैठकीत स्पष्ट केली.

## सस्पेन्स कायम



त्याचवेळी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाने पृथ्वीराज पाटील यांच्याशी संपर्क साधत काँग्रेस सोडू नका, असे आवाहन केले. त्यानंतर आ.विश्वजीत कदम यांच्याशी श्री.पाटील यांची चर्चा झाली.

मुंबईत पृथ्वीराज पाटील यांच्या सर्वच पक्षातील प्रमुख नेत्यांशी गाठीभेटी झाल्याचे सांगण्यात आले. भाजपातील प्रमुख नेत्यांना ते भेटले आणि विश्वजीत कदम यांच्याशीही त्यांची सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. यामुळे, ते काँग्रेस मध्येच राहणार का भाजपची वाट धरणार याबद्दलचा निर्णय अजून गुलदस्त्यातच आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये अस्वस्थ असलेले पृथ्वीराज पाटील पक्ष सोडतात का काँग्रेसश्रेष्ठी त्यांना थांबवण्यात यशस्वी ठरतात हे पाहणे कुतहुलाचे आहे.

# शासकीय निवासस्थानामुळे पोलिसांचे मनोबल वाढेल : ना.चंद्रकांत पाटील

**सांगली : हॅलो प्रभात**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस दल सतत कार्यरत असते. सांगलीपासून १५० किमी अंतरावर असणाऱ्या उमदी येथे पोलीस ठाणे अंतर्गत शासकीय निवासस्थानामुळे पोलिसांचे मनोबल वाढून त्यांची कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज व्यक्त केला. जत तालुक्यातील उमदी पोलीस ठाणे अंतर्गत एक पोलीस अधिकारी व ८ पोलीस अमलदार



यांच्यासाठी निवासस्थान इमारतीचे भूमिपूजन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, जतचे उपविभागीय अधिकारी अजयकुमार नष्टे, अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारावकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील साळुंखे, सरपंच मुत्तू तेली, डॉ. रवींद्र आरळी, अमृतानंद स्वामी, संजय तेली आदि उपस्थित होते. पोलीस दलाला अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्यमंत्री आग्रही असल्याचे सांगून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले,

या इमारतीसाठी जिल्हा नियोजन समितीमधून जवळपास ३ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. निवासस्थान इमारतीचे बांधकाम आठ ते नऊ महिन्यांत पूर्ण करावे. इमारतीच्या छतावर सौर ऊर्जा पॅनेल, अद्ययावत सोयी सुविधा व फर्निचर अशा या इमारतीस पूरक बाबी उपलब्ध करून देण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# रमेश थोरात यांच्या प्रवेशाची जय्यत तयारी



## नेत्यासोबत सामान्य कार्यकर्त्यांचाही प्रवेश

**दौंड : हॅलो प्रभात**

वरवंड येथे दौंड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार रमेश थोरात यांचा शुक्रवारी १ ऑगस्टला पक्षप्रवेश होईल. त्यासोबत काही कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश होणार असून त्याला उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार आहेत. रमेश थोरात यांचा पक्षप्रवेश असल्याने थोरात गटाकडून मोठा गाजावाजा केला जाणार आहे. १ ऑगस्टला वरवंड येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या पक्ष प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन होणार आहे. या पार्श्वभूमीवर पारगाव येथे रेणुका देवी सहकारी दूध उत्पादक संस्थेच्या मिटिंग हॉलमध्ये पदाधिकारी, समर्थक व हितचिंतकांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी माजी आमदार रमेश थोरात उपस्थित होते. दौंड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस एक नंबर आहे. रमेश थोरात यांच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादीची आणखी ताकद वाढणार आहे.

# समानतेचा संदेश देणारा भीमा कोरेगाव विजयी स्तंभ : राहुल रोकडे

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वार्ड क्र.१० मध्ये माजी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांच्या संकल्पनेतून निर्माण होत असलेल्या माता रमाई आंबेडकर उद्यानामध्ये उभारण्यात आलेल्या भीमा कोरेगाव विजय स्तंभाच्या नाविन्यपूर्ण स्थापत्य आणि सुशोभीकरण कामाची पाहणी अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे यांनी केली.

या परिसरात निर्माण होणाऱ्या अभ्यासिका,वाचनालय तसेच जलविहार या उपक्रमाचे

## माता रमाई आंबेडकर उद्यानाच्या कामाची पाहणी



कौतुक करुन लवकरात लवकर लोकार्पण करण्यासाठी जलद गतीने काम पूर्ण करण्याच्या सुचना बांधकाम विभाग तसेच मक्तेदांना यावेळी दिल्या. यावेळी उपायुक्त विजया यादव, नगर अभियंता महेश मदने, जनसंपर्क अधिकारी घनंजय हर्षद, प्रफुल्ल ठोकळे, अरुण आठवले, ॲड.काजल कांबळे, सचिन ऐवळे, अजय उबाळे, प्रणित चंदनशिवे, ऋषिकेश बनसोडे, सुशांत कांबळे, मयुर ठोकळे, विराज शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी रोकडे रोकडे म्हणाले, या स्तंभाच्या माध्यमातून ऐतिहासिक घटनांना उजाळा देत नव्या पिढीमध्ये आत्मसन्मान, समता आणि सामाजिक न्यायाचे मूल्य रुजावे हा उद्देश आहे. हे उद्यान केवळ विरंगुळ्याचे ठिकाण नसून, समाज प्रबोधनासाठी प्रेरणास्थळ म्हणून विकसित करण्यात येत आहे. सुशोभीकरणाचे हे काम वेळेत आणि दर्जात्मक पार पाडले जाईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

# डॉ.पूजा बागणे यांना 'सिम्बायोसिस हॉल ऑफ' फेम पुरस्कार

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**



येथील डॉ. पूजा अनिल बागणे यांना सिम्बायोसिस इंटरनॅशनल (डीम्ड युनिव्हर्सिटी) ने त्यांच्या प्रतिष्ठित 'हॉल ऑफ फेम पुरस्कार २०२५' या अध्यापन विभागातील सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले. कुलपती डॉ. एस.बी. मुजुमदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संजिवणी मुजुमदार, कुलगुरु डॉ विद्या येरवडेकर, डॉ. राजीव येरवडेकर, कुलगुरु डॉ. रामकृष्ण रामन, डायरेक्टर डॉ. केतन कोटेचा उपस्थीत होते. हा सन्मान पुणे येथील सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये झाला. डॉ. बागणे यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले सातत्यपूर्ण योगदान, विद्यार्थ्यांशी प्रभावी संवाद, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि शैक्षणिक नेतृत्व, समर्पणवृत्ती यामुळे त्या या पुरस्कारासाठी निवडल्या गेल्या. या पुरस्कारामुळे त्यांच्या उत्कृष्ट कार्याची व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घेतलेल्या मेहनतीची प्रशंसा करण्यात आली आहे.

# आष्टा नगरीच्या विकासकामांना प्राधान्य देऊ : राहुल महाडीक

**आष्टा : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पक्षाची विचारसरणी समाजातील सर्व स्तरांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी नेहमीच कटिबद्ध असून पक्षाच्या याच विचारांवर वाटचाल करत असताना पक्ष विस्तारासह विकास कामे तसेच युवकांचे संघटन,कल्याण याच अजेंड्यासह सक्रियपणे कार्यरत राहणार असल्याचा विश्वास भाजपा नेते,सांगली जिल्हा बँकेचे संचालक राहुल

## आष्टा शहरातील कार्यकर्त्यांचा भाजपा प्रवेश



महाडीक यांनी व्यक्त केला.आष्टा येथील भाजपा कार्यकर्ता प्रवेश कार्यक्रमावेळी ते बोलत होते.या प्रसंगी भाजपा नेते राहुलदादा महाडिक व भाजपचे सांगली जिल्हाध्यक्ष सम्राटबाबा महाडीक यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.

यावेळी बोलताना राहुल महाडीक म्हणाले, भारतीय जनता पक्षाच्या विचारावर वाटचाल करण्यासाठी विविध पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करत आहेत. आपल्या पक्ष विस्तारासाठी ही जमेची बाजू आहे.येत्या काळात युवकांच्या विविध प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका असून त्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार आहे. यावेळी शहरातील युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# भावाच्या कामगिरीचा गर्व : सुरेखा शिंदे



## बहीणीकडून भावाला कारगिलमध्ये जाऊन आदरांजली

**घाटनांद्रे : जालिंदर शिंदे**

सव्वीस वर्षा पूर्वी पाकिस्तान सैन्याने दहशतवाद्यांच्या रुपात जम्मू काश्मीरच्या खोऱ्यात घुसखोरी करत 'एलसी' अर्थात नियंत्रण रेषा भारताचा भूभाग काबीज केला होता.द्रास,बटलिक,कारगिल या क्षेत्रात भारतीय सैन्यानी ६० दिवस आपल्या प्राणाची बाजी लावून पाकिस्तानी सैन्याला पळवून लावले होते.

यामध्ये ५०० हुन अधिक आपले जवान शहीद झाले होते. त्यामुळेच २६ जुलै हा 'कारगिल विजय दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यामध्ये महादेव नामदेव पाटील (वडगाव ता तासगांव) व सुरेश गणपती चव्हाण (करोली-टी ता कवठेमहंकाळ ) या दोन जिल्ह्यातील जवानांचा समावेश होता. पाकीस्तान विरुद्ध छेडण्यात आलेल्या या ऑपरेशन विजय मोहीमेत तासगाव तालुक्यातील वडगाव येथील महादेव पाटील हे पॅरा रेजिमेंट असणारे जवान २४ जुलै १९९९ रोजी जम्मू काश्मीर परिसरात पाक घुसखोराशी लढत असताना शत्रुच्या गोळीचा निशाण ठरले व अवघ्या चोविसाव्या वर्षी देशासाठी कामी आले. तदनंतर अवघ्या दोन दिवसांतच ऑपरेशन विजय भारतीय सैन्यानी घुसखोर पाक सैनिकांना पळवून लावून यशस्वी झाले.

# पाणी सोन्यासारखे जपून वापरा

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचा जतकरांना सल्ला

**जत : हॅलो प्रभात**

शहात्तर हजार कोटी पंचेचाळीस लाखांचा बहुचर्चित जत शहर पाणीपुरवठा पेयजल योजनेचे उद्घाटन अखेर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी जतकरांशी संवाद साधताना जिल्ह्याचे पालकमंत्री पाटील यांनी पाणी सोन्यासारखे जपून वापरण्याचा सल्ला दिला. यानंतर ते पुढे म्हणाले, आ. पडळकर हा मोदींच्या तालमीत तयार झालेला आहे, त्यामुळे त्यांनी निवडणूकी वेळी दिलेल्या जाहीरनाम्यातील आश्वासने पूर्ण करतील, झोपेत सुद्धा गोपीचंद खोटं बोलत नाही. त्यामुळे जतकरांसाठी येत्या काळात चांगले दिवस येणार आहेत. यापूर्वी पालकमंत्र्यांच्या हस्ते उमदी येथील पोलिस निवास गृह, जाड्रबोबलाद येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे व जत येथील वन विभागाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.



# बावडा येथे अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

**इंदापूर : हॅलो प्रभात**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसा निमित्त इंदापूर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व भगवानराव भरणे प्रतिष्ठानच्यावतीने बावडा येथे किसान सार्वजनिक वाचनालय हॉलमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात होते यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केल्याची माहिती पंडितराव पाटील यांनी दिली.

यावेळी रक्तदान शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी किसान सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पंडितराव पाटील कार्याध्यक्ष महादेव घाडगे, विक्रम घोगरे,विक्रांत घोगरे , सुरेश शिंदे, उमेश पाटील,निलेश घोगरे, प्रसाद ढवळसकर,अनिल सुक्रे, ज्ञानदेव बागल,रणजित घाडगे अजित टिळेकर मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान या शिबिरास श्रीराज भरणे , हनुमंत कोकाटे यांनी भेट दिली.रक्तदात्याना इंदापूर रक्तपेढीच्या वतीने प्रमाणपत्र व आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. या शिबिराची सर्व व्यवस्था विक्रम घोगरे,प्रसाद ढवळसकर,उमेश पाटील,रणजित घाडगे,विजय साळुंखे यांनी पाहिली.

# राष्ट्रीय सहकार धोरणामुळे देशाच्या प्रगतीत भर : विवेक कोल्हे

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय स्तरावर अमित शहा यांच्या मार्फत सहकार क्षेत्राच्या उत्कर्षासाठी स्वतंत्र खाते निर्माण करून राष्ट्रीय सहकार धोरण जाहिर केले ते देशाच्या प्रगतीत भर घालणारे आणि सहकाराच्या आर्थीक बळकटीसाठी पोषक असल्याची प्रतिक्रिया इफको नविदिल्लीचे संचालक व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी दिली. ग्रामिण अर्थकारणाचा पाया सहकारी सोसायटीमुळे मजबुत झाला असुन त्याच्या व्याप्तीसाठी हे धोरण स्वागतार्ह आहे असेही ते म्हणांले.

त्यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, सहकारातुन समृध्दी या दिशेने देशाच्या भविष्याची वाटचाल सुखकर व्हावी यासाठी केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय सहकार धोरण नुकतेच जाहिर केले ते लोकशाही मुल्यांची वृध्दी करणारे आहे. देशात ८ लाख ५० हजार सहकारी संस्थेच्या माध्यमांतुन ३० कोटी सभासद शेतकरी कार्यरत आहेत. सकल उत्पन्नात सहकाराचा वाटा मोठा आहे. या धोरणांतुन युवक, महिला, शेतकरी, उद्योजक यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, आत्मनिर्भरता मजबुत करण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावर जाणिवपुर्वक प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सहकार क्षेत्राच्या वाढीसाठी जाणिवपुर्वक प्रयत्न करून त्यानुरूप सहकार क्षेत्राची सुसंगत ध्येय धोरणे अंमलबजावणी केली. आर्थीक न्याय, नैतिक नेतृत्व यांच्या माध्यमांतुन केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी जाहिर केलेले राष्ट्रीय सहकार धोरण मानवतेच्या उज्वल भवितव्याचे मोठे पाउल आहे. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थकारणाला दिशा देण्यांत माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी केलेले काम सहकाराचा वारकरी म्हणून नजरेसमोर दीपस्तंभासारखे उभे आहे असेही शेवटी ते म्हणाले.

# दुधगांवमध्ये ३१ पासून ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहास प्रारंभ

**दुधगाव : हॅलो प्रभात**

श्री दुधेश्र्वर पारायण मंडळ, दुधगाव आणि सर्व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सप्ताह गुरुवार, दि.३१ जुलै रोजी प्रारंभ होणार असून बुधवार, दि. ०६ ऑगस्ट रोजी समारोप होणार आहे.या सप्ताहात दररोज पहाटे ४ वा. काकड आरती, सकाळी ७ वा श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३वा.गाथा भजन, ४ वा. हरिपाठ, रात्री ९ वा. किर्तन, जागर भजन आयोजन करण्यात आले आहे. भाविकांसाठी अध्यात्मिक आनंद देणाऱ्या या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाच्या मुख्य प्रवचन व कीर्तनकारांमध्ये विविध कीर्तनकार असणार आहेत. या निमित्ताने दुधगाव परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थ, महिला मंडळे, तरुण मंडळे, हरिपाठ सेवा मंडळे यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

जागर भजन साठी श्री दुधेश्वर-दत्त भजनी मंडळ दुधगाव,श्री हनुमान भजनी मंडळ दुधगाव, श्री नवनाथ भजनी मंडळ भेंडवडे, श्री लक्ष्मी व श्री हनुमान भजनी मंडळ सावळवाडी, माळवाडी,श्री सद्गुरु संत पिराजी महाराज (सुतार)भजनी मंडळ, दुधगांव, श्री विठ्ठल भजनी मंडळ, लक्ष्मीवाडी (आळते) यांचे असेल. तसेच रात्री विना सेवेसाठी जय हनुमान ग्रुप, दुधेश्वर गोल्डन ग्रुप,जय भवानी गणेश मंडळ,विक्रम सिंह गणेश मंडळ, ज्वाला मित्र मंडळ , सुतार दर्गा मित्र मंडळ, दुधेश्वर युथ क्लब,हिंदवी स्वराज्य गणेश मंडळ,शिवशंभो गणेश मंडळ या मंडळांचा सहभाग असेल.

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक दुधेश्वर पारायण मंडळ व दुधेश्वर मंदिर कमिटी ट्रस्ट, सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, विविध सहकारी संस्था, विविध सांस्कृतिक मंडळे दुधगाव, समस्थ ग्रामस्थ, भक्तजन यांनी केले आहे. भाविक भक्तांनी या पवित्र सप्ताहात सहभागी होऊन अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# नाणेगावात शौचालयाच्या विंड पाईप उघड्याच

## डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नायलॉनच्या जाळ्या बसवण्याची मागणी

**उंब्रज : हॅलो प्रभात**

नाणेगाव पुनर्वसन,(ता.कराड) येथे गत पंधरवड्यात डेंग्यू सदृश्य रुग्ण सापडले होते. त्यानंतर आरोग्य विभागानेकंटेनरसर्वेक्षण,शौचालयाच्या विंड पाईपला जाळ्या बसवणे, होम टू होम सर्व्हे यांसारख्या तातडीच्या डेंग्यू प्रतिबंधात्मक उपायोजना करून परिसरातील डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यात यश मिळवले होते.परंतु,आज पंधरा दिवसानंतर नाणेगावच्या शौचालयांची पाहणी केली असता काही शौचालयांच्या विंड पाईपला जाळ्याच नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाचा फोलपणा उघड झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. काही शौचालयांच्या



विंड पाईपला जाळ्या बसवून उर्वरित शौचालयांच्या विंड पाईपला जाळ्या बसवण्याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असून त्यामुळे डेंग्यू प्रादुर्भावाची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता नाकारता येत नसून तातडीने उर्वरित शौचालयांच्या विंड पाईपला जाळ्या बसवून सार्वजनिक आरोग्य जपावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.


# जैन भट्टारक मठाला मेकॅनिकल हत्ती भेट देण्याचा प्रस्ताव

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जैन समर्थक आणि इतर प्राणी कल्याणाचा विचार करणाऱ्याच्या वतीने द फेडरेशन ऑफ इंडियन एनिमल प्रोटेक्शन ऑर्गनाइजेशन्स (एफआयएपीओ)- जे भारतातील २०० पेक्षा अधिक प्राणी संरक्षक संघटनांचा महासंघ आहे- त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील नंदिनी गावामध्ये स्वस्तिश्री जिंसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठाला एकदम जिवंत हत्तीसारखा दिसणारा मैकेनिकल हत्ती दान देण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

हा प्रतीकात्मक आणि कारुण्यपूर्ण पर्याय मठाला जिवंत हत्ती न वापरता त्यांच्या धार्मिक विधी चालू ठेवण्यासाठी मदत करण्याच्या उद्देशाने मांडण्यात आला आहे.

सन्मानीय मुंबई हाय कोर्टने महादेवी नामक हत्तीणीच्या पुनर्वसनाचा निर्देश दिल्यानंतर, हा प्रस्ताव मांडण्यात आला. महादेवीला या मठामध्ये ३० वर्षापेक्षा अधिक काळ एकांतात ठेवण्यात आले होते.




# सांगली जिल्हा शिक्षण संस्था संघाची बैठक संपन्न

**सांगली : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रातील खासगी शिक्षण संस्थांमुळे बहुजन समाज शिकला. राज्याच्या प्रगतीत संस्थांचे योगदान लक्षवेधी आहे. शिक्षण संस्थांचे कार्य हे धर्मादाय स्वरुपाचे आहेत. त्यामुळे ग्रामविकास विभागाने ग्रामीण भागातील खासगी शाळांची घरपट्टी माफ केली आहे. तथापि महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मनपा हद्दीतील शाळांना सामान्य व इतर करातून सूट दिली असताना सांगली महापालिका अन्यायकारक भरमसाठ घरआकारणी करुन शिक्षण संस्थांना नोटीसा लागू केल्या आहेत. याप्रकरणी शिक्षण संस्था चालक शिष्टमंडळाने मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांना भेटून मनपा हद्दीतील खासगी शाळांना व्यापारी पध्दतीने घरपट्टी आकारणी करुन दिलेल्या नोटीसा मागे घेऊन निवासी दराने शाळांना घरपट्टी आकारणी करावी अशी मागणी करणार असे प्रतिपादन संघाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी केले. ते सांगली जिल्हा संघाच्या कार्यकारिणी बैठकीत बोलत होते.



या बैठकीत संस्था चालकांनी अन्यायी घरपट्टी आकारणी बाबत तीव्र असंतोष व्यक्त करुन या प्रकरणी कायदेशीर व रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला.

या बैठकीत संचमान्यता सुधारित आदेशाला शासनाने स्थगिती दिली आहे. संचमान्यता पूर्वीप्रमाणेच करावी. सुधारित आदेश रद्द केल्याचा जीआर मागे घ्यावा, शाळांमध्ये कंत्राटी शिपाई भरतीचा शासन निर्णय रद्द करावा आणि थकीत वेतनेतर अनुदान तातडीने द्यावे व वेतनेतर अनुदानाची गणना सातव्या वेतन आयोगाच्या वेतनावर करावी.

तुंटपजे वेतनेतर अनुदान आणि तेही थकीत झाले आहे त्यामुळे शाळा चालवणे मुश्किल झाले आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून अत्यंत कमी उमेदवार पाठवले जातात. एका जागेसाठी दहा उमेदवार पाठवण्याची तरतूद असताना त्याची अंमलबजावणी होत नाही.

त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. शासनाने गांभीर्याने लक्ष घालणे आवश्यक आहे. अशा व्यथा संस्थाचालकांनी मांडल्या. यावर रावसाहेब पाटील म्हणाले, ङ्कसंस्थावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध शासनाकडे दाद मागणार आहे.

यावेळी प्रा. आर. एस. चोपडे,शशिकांत राजोबा, प्रा. एन.डी.बिरनाळे,विनोद पाटोळे, नितीन खाडीलकर,प्रा. शिवपुत्र आरबोळे, वैभव गुरव, नंदकुमार अंगडी, भारत दुधाळ, लगमाण्णा गडगे, प्रा. एम. एस. रजपूत, दिग्विजय चव्हाण, बी. जे. पाटील व संस्थाचालक उपस्थित होते.

# तासगावात बजाज फायनान्स कडून नियमबाह्य कर्ज वसुली

## मनसेची तहसीलदारांच्याकडे तक्रार

**तासगाव : हॅलो प्रभात**

तालुक्यात बजाज फायनान्सकडून नियमांचे उल्लंघन करून अवाढव्य व्याजदराने तसेच जबरदस्तीने व अन्यायकारक पद्धतीने कर्जाच्या वसुली सुरु आहे. त्यांच्यावर तात्काळ कारवाई करा अशी मागणी मनसे नेते अमोल काळे यांनी तहसीलदार अतुल पाटोळे यांना निवेदनाद्वारे केली. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात अमोल काळे यांनी सांगितले की, शहरासह तासगाव तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक लोक या बजाज फायनान्सच्या त्रासाला कंटाळले आहेत. बजाज फायनान्स कंपनीकडून लोकांना फोन केले जातात की, आमच्या कडून कर्जाचे वितरण चालू आहे. आपल्याला कर्ज हवे असल्यास बजाज फायनान्सच्या कार्यालयाशी संपर्क साधा. आर्थिक अडचणीत असलेले लोक ते कर्ज घेतात. कर्जाचा व्याजदर हा राष्ट्रीय बँकेच्या व्याजदरा इतका असावा, पण यांच्या कडून व्याजदर हा ३० % वार्षिक इतका आकारला जातो.

कर्जदार हे कर्ज फेडताना हप्त्यांमध्ये फेडतो. एखादा हप्ता देण्यास कर्जदारास उशीर झाला तर, या बजाज फायनान्स कंपनीच्या वसुली एजंटकडून कुटुंबातील आई, बहिण, बायको यांना फोन केले जातात. कर्ज घेतलेला व्यक्ती घरी नसताना रात्री, अपरात्री घरी जातात. यावेळी वसुली एजंटकडून कुटुंबातील महिलांना त्रास दिला जातो. कर्जाची वसुली करण्यासाठी दमदाटी आणि अश्लील भाषा वापरली जाते. बजाज फायनान्सकडून दबाव तंत्राचा वापर केला जात आहे.

बजाज फायनान्स कंपनीला रिझर्व बँकेने काही गोष्टींच्या अधीन राहून वसुली करण्यास बजावले आहे. यमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० ही वेळी ग्राहकांना फोन करण्याची आहे, परंतु सायंकाळी ५.३० नंतरही फोन केले जातात.

या कंपनीला कर्जदारास नोटीस बजावल्याशिवाय घरी येण्याचा अधिकार नाही. कंपनीकडून बी आर टी ऑर्डर असल्याशिवाय घरी येण्याचा अधिकार नाही. पँडामिक ऍक्ट इन फोर्स या काळात बिल्कुल रिकव्हरी करता येत नाही. तसेच कायद्याच्या अधीन राहून मागणी करणे आवश्यक आहे त्याला शिवीगाळ व धमकी देऊ नये असा नियम आहे. मात्र वरील सर्व अधिकार व नियम मोडून रिझर्व बँकने घालून देलेल्या नियमांचे उल्लंघन करून कर्ज वसुली केली जाते. त्यांच्यावर तात्काळ कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा अमोल काळे यांनी दिला आहे.

# लक्ष्मीनारायण पतसंस्थेस ६१ लाखाचा नफा

**सतीश कोडाणीकर**

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

सभासदांचा विश्वास व कर्मचाऱ्यांची सचोटी यामुळे संस्थेस गेली २८ वर्षे ऑडिट वर्ग अ राखण्यात यश आले असून सभासदांना १२% लाभांश देण्यात येणार असल्याची घोषणा लक्ष्मीनारायण पतसंस्थेचे चेअरमन सतीश कोडणीकर यांनी केली. येथील लक्ष्मी नारायण किधर शेती सहकारी पतसंस्थेच्या २८ व्या वार्षिक सभेत ते बोलत होते अध्यक्षस्थानी पाटबंधारे विभागाची सेवानिवृत्त अधिकारी विलास पुजारी हे होते.

श्री.कोडणीकर पुढे बोलताना म्हणाले संस्थेच्या देवी ३७.७५ कोटी पर्यंत पोहोचल्या आहेत. संस्थेने विविध प्रकारच्या कर्ज योजनेतून २७.८० कोटी कर्जपुरवठा केला आहे. संस्थेत चालू आर्थिक वर्षात ६१लाख ६१ हजार रुपये इतका नफा झाला आहे हे सर्व सभासदांचा विश्वास व कर्जदारांनी वेळेवर कर्ज परतफेड केल्यामुळे झाले आहे.

यावेळी सतीश खोबारे,पी आर जमखंडीकर, उमेश पुजारी, गुरुप्रसाद रिसिबुड, बाळासाहेब कुलकर्णी यांनी मनोगते व्यक्त केली.

स्वागत आणि प्रास्ताविक व्हाईस चेअरमन कु. विजया पुजारी यांनी केले. विषय पत्रिकेचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी सौ वनिता शिंदे यांनी केले. आभार श्रीपाद खोचरे यांनी मानले. यावेळी ऍड व्ही.जी.सरदेसाई, डॉ. किरण अनुजे, शशिकांत बड्ड, पुजारी महादेव पुजारी, अवधूत भिलवडे, माधव घाटे पुजारी, दीपक कबाडे, सोनू पुजारी, आनंदा कोकणे, दिगंबर शेलार बाळासाहेब दुगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# ३२ मैल लोहगड सांगलीकरांनी केला सर

**सांगली : हॅलो प्रभात**

युवा विकास कल्याणकारी सेवाभावी संस्थेच्या वतीने सातत्याने गड कोट किल्ल्याची सफर केली जाते. काल शेकडो मावळ्यांना घेऊन समुद्रसपाटीपासून १०३३ मीटर उंचीवर असलेल्या लोहगडची सांगलीकरांनी सफर केली. त्या ठिकाणचे बुरुज, बुलंद दरवाजे तोफा आजही चांगल्या स्थितीत आहेत. मावळ्यांच्या गर्दीमुळे व निसर्ग सौंदर्य यामुळे किल्ला फुलून गेला होता.

अष्टोत्तर वर्षाच्या तुकाराम घागरे यांनी सहजपणे ही सफर पूर्ण केली संस्थेचे अध्यक्ष युवराज शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले ते म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास नवीन तरुण तरुणींना माहिती असणे गरजेचे आहे.

त्यासाठी अशा गडकिल्ल्यांच्या सफारी करणे गरजेचे आहे.

पावसाचा अंदाज घेऊन सर्वांनी गड किल्ले सफर करावेत. आत्ताचे वातावरण अत्यंत उत्तम असून सर्व डोंगरदऱ्यातून हिरवळ व मोठमोठे धबधबे वाहत आहेत. त्याचा सर्वांनी पाहण्याचा लाभ घ्यावा.



आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष युवराज शिंदे, रामहरी ठोंबरे, जितेंद्र भोसले, राजकुमार पेडणेकर, संदीप चौगुले, मकरंद पेडणेकर, श्रीकांत पाटील यांनी केले.

यामध्ये संगीता पाटील उत्तम लाड, माया लाड, उत्तमराव पाटील, रेखा पाटील यांच्यासह अनेकांनी सहभाग घेतला.